# लेक

पाटलांची लेक थोरली नाव तिचे मीना
दिवस तिचा उगवेना बडबडी विना।
दिसायला आहे ती साजिरी गोजिरी
परंतु नाही मात्र लाजरी भित्री।

खायला, प्यायला, फिरायला आवडते फार तिला
कारण साऱ्याच गोष्टी गौण वाटतात तिला
पैशाला दुय्यम मानत असते नेहमी
म्हणूनच तिला परके वाटत नसत कुणी
प्रत्येकाशी ही आपुलकीनी बोलते
कुणाचेही नेहमी ही चांगलेच चिंतते

चारचौघात जायला केव्हाही ही तय्यार
आणि त्यातून मिळविते ती आनंद अपार
लठ्ठ खूप आहे तिला बसता उठता येईना
डायटिंग करावसे मुळीच कधी वाटेना।

डोक्यावर समोर केस आहेत अगदी विरळ
सगळे म्हणतात, "भव्य कपाळ भाग्य आहे थोर"
मन आहे निर्मळ वागणं आहे आनंदी
ती कधी फिकीर करत नाही जराश्या काही
गोष्टींची।

चालविता येईना तिला एकही गाडी
नवऱ्याच्या किंवा मुलांच्या गाडीवरच हिंडते
स्वाभिमानी आहे ती आनंदी गृहिणी
मजेशीर असते तिची नेहमीच कहाणी। →

लेख.

Page No.

Date :

सासरच्यांची कधीच माहेरी केली नाहि तक्रार
कारण तो आहे स्त्रिया माहेरचा संस्कार
माहेरची सुखं ती मनात ठेवते जपून
त्याच्या भरवशावर संसारातील दुःखांना संपवून।

पाहुण्यांचे करते ती यथायोग्य स्वागत
राग, रुसवा, दुःख नाही कधीच जाणवू देत
गप्पांचा आहे तिच्याजवळ भरपूर स्टाक
म्हणूनच प्रत्येक ठिकाणी असतो तिचा स्कोप।

मैत्रिणींच्यासोबत शॉपिंगला जाते ऑटोने
खूप पैसे खर्च करते त्याचे कधीच नाही वाद
आरडाओरडा, हसणे, खिदळणे, मोठ्याने बोलणे
घरात असते चैतन्य हीच्याच कारणाने।

केविलवाणी आगतिक नसते ती कधीच
वर्षांमागून वर्षे चालतील अशीच।

तेवढाच नवरा शांत आहे अगदी सरळ साधा
त्याच्या मात्र मागे लागते ही सदानकदा
आवडत नाही तरी त्याला तो बोलत नाही कधी
एवढेच म्हणतो गमतीने, आज नाही उद्या ही
सुधारेल कधीतरी !!!

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
अमरावती